Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

14

# बॅ. रामराव देशमुख यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील योगदान

**प्रा. डॉ. अमोल भाऊरावजी बंड**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
आदर्श विज्ञान जयरामदास भागचंद कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे.

---

**सारांश :-**
बॅ. रामराव देशमुख यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. बॅ. रामराव देशमुख यांनी जून 1931 मध्ये काँग्रेसचे सर्वाधिकारी महात्मा गांधी यांना सुद्धा वऱ्हाडचा दर्जा ठरवण्यासंदर्भात पत्र लिहिले होते. प्रथमतः ऑक्टोंबर 1938 मध्ये मध्य प्रांतापासून वऱ्हाडला स्वतंत्र प्रांत बनवण्याचा प्रस्ताव त्यांनी विधिमंडळासमोर मांडला. तसेच 1932 मध्ये वऱ्हाड सर्वपक्षीय समितीची सभा अकोला येथे पार पडून त्यामध्ये सुद्धा हा ठराव पास झाला होता. त्यानंतर हिंदुस्तान मध्ये प्रांताची रचना ही भाषावार करण्यात यावी त्या धोरणाला राष्ट्रीय सभेने मंजूर दिली होती. या योजनेनुसार वऱ्हाडमध्ये प्रांताचे नागपूर,विदर्भ आणि महाकोशल असे तीन भाग निर्माण केले आहे. भाषेच्या आधारावर वऱ्हाड मध्यप्रांताचे तीन प्रांत निर्माण केले ते दोनच प्रांत करायला पाहिजे होते. नागपूर वऱ्हाड हे मराठी भाषिक प्रांत असल्यामुळे नागपूर वऱ्हाड मिळून एकच प्रांत निर्माण करायला पाहिजे होता. वऱ्हाड मध्यप्रांताचे भाषेवर आधारित महाविदर्भ व महाकोशल असे दोन प्रांत निर्माण करायला पाहिजे होते. दिनांक 1 ऑक्टोंबर 1938 रोजी मध्यप्रांत वऱ्हाडच्या खरे मंत्रिमंडळातील मंत्री बॅ. रामराव देशमुख यांनी मद्यप्रांत वऱ्हाड मधील मराठी भाषिक प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत निर्माण करून त्याला विदर्भ असे नाव देण्यात यावे अशा मागणीचा ठराव कायदेमंडळामध्ये मांडला होता. तो मंजूर सुद्धा झाला होता परंतु बॅ. रामराव देशमुख मंत्रीपदाकरिता योग्य व्यक्ती असून सुद्धा त्यांना पुन्हा मंत्री मंडळामध्ये घेण्यात आले नव्हते. हा ठराव मध्य प्रांत कायदेमंडळाने जरी संमत केला असला तरी नागपूर वऱ्हाडच्या एकीकरणाची जनतेची मागणी सुसंघटित जनआंदोलन उभारल्याशिवाय पूर्ण होणार नाही या उद्देशाने 18 ऑगस्ट 1940 रोजी बॅरिस्टर रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे महाविदर्भ परिषदेची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली, महाविदर्भाची मागणी आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ हे एकमेकास सहाय्यकच होती. बॅ.रामराव देशमुख ही सुरुवातीपासूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा याच विचाराचे समर्थक होते तसेच महाविदर्भ चळवळ सुद्धा त्यांच्याच नेतृत्वात कार्यरत होती त्यामुळे त्यांच्या संदर्भात अपसमज निर्माण करण्यात आला. त्यांचे धोरण हे अस्पष्ट आहे असे आरोप त्यांच्यावर लावण्यात आले परंतु त्यांच्या स्पष्टवक्तेपणा व कार्याद्वारे लोकांना समजले की वऱ्हाड हा मध्यप्रांताला जोडल्यामुळे वऱ्हाळामध्ये असंतोषाची भावना आहे कारण मध्य प्रदेशातील हिंदी भाषिक बहुसंख्यांक प्रांत हा संख्या व शासनाच्या जोरावर मराठी भाषिक प्रदेशावर अन्याय करतो हिंदी भाषेत बहुसंख्यांक प्रांताकडून मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकी मधूनच महाविदर्भाची मागणी पुढे आली आहे मध्य प्रांतातील मराठी भाषिक प्रांताने भविष्यामध्ये मध्यप्रदेशात राहायचे नाही असा निश्चय करून महाविदर्भातवादी आंदोलन पुकारले महाविदर्भवाद्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी व्हावयास एक अडथळा होता. सन 1936 मध्ये निजाम आणि वऱ्हाड इंग्रजांकडे बहाल करताना त्यांच्यासोबत एक करार केला होता व त्या करारातील शर्तीनुसारच वऱ्हाळ मध्य प्रदेशात सामील करण्यात आला होता ज्या करारातील एक अ अशी होती की निजामाच्या परवानगीशिवाय च्या प्रशासनामध्ये कोणताही बदल करता येणार नाही त्याच वेळेस ब्रिटिश सत्ता एका बाजूने निजामाचे लाड पूर्वीत होती व दुसऱ्या बाजूला भारतीयांना सत्ता सोपविण्याच्या विचारात होती अशा स्थितीत वऱ्हाड पुन्हा निजामाच्या नियंत्रणाखाली जाण्याची भीती होती त्यामुळे महाविदर्भवादी चळवळ ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून वेगळी राहिली तसेच महाराष्ट्र अस्तित्वात येण्यासाठी विलंब लागला तर वर्धा नदीपर्यंत असलेला सर्व मराठी भाषिक प्रांत तसेच भंडारा तसेच नागपूर जिल्हा हिंदी भाषिक महाकोशाल गिळंकृत करेल अशी भीती सुद्धा वाटत होती या भीती संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येणे संभाव्य नसेल तर महाविदर्भ तात्काळ अस्तित्वात यावा अशी भूमिका बॅ. रामराव देशमुख व काही महाविद्यावाद्यांची होती व तात्कालीक परिस्थितीनुसार योग्यच होती. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळताच निजामाचा करार संपुष्टात आला व योग्य परिस्थिती लक्षात घेऊन महाविदर्भवाद्यांकडून संयुक्त महाराष्ट्राच्या मराठी राज्यात समाविष्ट करून घेण्याची मागणी यशस्वी झाली. अशा प्रकारे महाविदर्भवादी चळवळ ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीला सहाय्यकच होती.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

बॅ. रामराव देशमुख यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचे अध्ययन करणे

शोधनिबंधाची गृहीतकृत्ये :-बॅ. रामराव देशमुख यांची संयुक्त मध्यप्रांत व वऱ्हाड येथून तर महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत त्यांची भूमिका ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या बाजूची होती.

**१)प्रस्तावना. :-**

मध्य प्रांतातील नागपूर विभाग आणि मुंबई प्रांतातील खानदेश प्रांताच्यामध्ये असलेल्या अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या चार जिल्ह्यांचा समावेश वऱ्हाडमध्ये होतो. या चार जिल्ह्यांवर ब्रिटीशांच्या वहिवाटीवर आधारित राज्यकारभार होत होता परंतु

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

त्यांना ब्रिटिशांनी खालसा केलेले जिल्हे असे म्हणता येत नव्हते. निजाम आणि भोसले यांच्यातील वादाचे मूळ म्हणजे हे चार जिल्हे होते. इ.स. 1803 मध्ये भोसले व इंग्रज यांच्यामध्ये युद्ध होऊन भोसल्यांचा पराभव करत वऱ्हाड इंग्रजांनी ताब्यात घेतला. सन 1803 ते 1853 पर्यंत वऱ्हाड हा निजामाच्या ताब्यात होता. या काळामध्ये इंग्रजांनी निजामाच्या संरक्षणाकरिता तैनाती फौज दिली होती, त्या फौजेवर खर्च करण्याची जबाबदारी निजामाची होती. परंतु तत्कालीन वऱ्हाडमधील महसूल व्यवस्थेमध्ये इंग्रजी फौजेचा खर्च निजाम पूर्ण करू शकत नव्हता. त्यामुळे इंग्रजांचे निजामावरील कर्ज वाढू लागले व 1853 मध्ये निजामाने वऱ्हाड इंग्रजांकडे गहाण ठेवला. सन 1853 ते 1902 पर्यंत वऱ्हाडवर इंग्रज रेसिडेन्सी मुलुख म्हणून कारभार पाहत होते. राज्यकारभाराच्या सोयीकरिता 1904 मध्ये वऱ्हाड हा मध्यप्रांताशी जोडण्यात आला त्यावेळी वऱ्हाळामध्ये चार जिल्हे होते. लोकसंख्या 28 लक्ष आणि उत्पन्न हे 78 लक्ष होते आणि मध्य प्रांतामध्ये 18 जिल्हे, 96 लक्ष लोकसंख्या व 85 लाख उत्पन्न होते. अशाप्रकारे वऱ्हाडवर मालकी निजामाची व वहिवाट इंग्रजांची होती. वऱ्हाडमधील जनता आपल्या कष्टाचे अडीच कोटी रुपये दरवर्षी तिजोरीत टाकत होती. त्यामधील 60 लाख रूपये मध्यप्रांतावर व 25 लाख निजामाची मालकी हक्क म्हणून दिले जात होते. वऱ्हाडमधील जनतेवर बेरोजगारी आणण्याचे कारण वऱ्हाडमधील पैसा हा मध्यप्रांतावर खर्च करणे हे होते. अशाप्रकारे मध्य प्रांतावर अन्याय होत होता.

**२)सिम समितीच्या शिफारशी :-**

वऱ्हाडचे आमदार मध्यप्रांताकडून वऱ्हाडवर नेहमीच अन्याय होतो. मध्य प्रांताकडून वऱ्हाडचे शोषण केल्या जाते, मध्यप्रांत-वऱ्हाडच्या एकूण उत्पन्नापैकी फारच अल्प प्रमाणात खर्च हा वऱ्हाडवर केल्या जातो अशाप्रकारचा आरोप करीत असत व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तथ्य होते. वऱ्हाड हा मध्यप्रांतास 1902 मध्ये जोडण्यापूर्वी वऱ्हाडच्या उत्पन्नाच्या 50 टक्क्याहून अधिक भाग वऱ्हाडच्या विकासकार्याकरिता खर्च केला जात असे. वऱ्हाडची जमीन महसूल पद्धती ही मध्यप्रांतापेक्षा भिन्न व मुंबई प्रांताशी जुळणारी होती. तसेच वऱ्हाडमधील शैक्षणिक संस्था ह्या मुंबई विद्यापीठाशी संपर्क ठेवून होत्या. वऱ्हाड व मध्यप्रांत हे भिन्न आहेत अशी भावना जनतेमध्ये उत्पन्न झाली होती. कारण वऱ्हाडच्या संमतीशिवाय तो मध्यप्रांताला जोडण्यात आला होता. वऱ्हाडप्रांताची जवळीकता ही मुंबई प्रांताशी अधिक होती. अशाप्रकारची चर्चा मध्यप्रांत विधिमंडळामध्ये होत असे. सन 1921 ते 1923 मध्ये अमरावती व अकोला या शहरात पिण्याच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला. एवढेच नाही अमरावती व आपल्यापेक्षा मध्यप्रांतातील मागासलेल्या मंडला जिल्ह्यामध्ये चांगले रस्ते होते. त्यामुळे इंग्रज अधिकारी सिम यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक समिती नेमली. या समितीमध्ये महाजनी व आर. आर. जयवंत हे वऱ्हाडचे प्रतिनिधी एम.आर. दीक्षित हे मध्यप्रांतातील मराठी भाषिक जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून व खांडव्याचे मथुरा प्रसाद हे हिंदी भाषिक प्रदेशाचे प्रतिनिधी अशा एकूण चार सदस्यांची नेमणूक करण्यात आली. या पाच सदस्य समितीतील तीन सदस्यांनी वऱ्हाड व मध्य प्रांतांमध्ये महसुलाची वाटणी संदर्भात तत्त्व मान्य केले व यानुसार वऱ्हाडवर 40% एवढा खर्च करण्याचे निश्चित केले होते तर मध्य प्रांतावर 60 टक्के खर्च करण्याचे निश्चित झाले. यासंदर्भात बॅ. रामराव देशमुख यांनी वारंवार सभागृहाला या सूत्राची आठवण करून दिली व त्यानुसार खर्च व्हावा यासाठी सभागृहांमध्ये दबाव टाकला.

**३)मध्यप्रांतापासून मराठी भाग वेगळा करण्यासंदर्भातील ठराव :-**

मध्यप्रांत वऱ्हाडमध्ये खरे प्रकरणानंतर मराठी भाषिक प्रदेश वऱ्हाडला असे ठामपणे वाटू लागले की आता हिंदी प्रांतापासून वेगळे होण्याची वेळ आली आहे. याचाच परिणाम म्हणून बॅ. रामराव देशमुख यांनी ऑक्टोबर 1938 रोजी वऱ्हाडला स्वतंत्र प्रांत बनविण्याचा प्रस्ताव विधिमंडळासमोर मांडला. हा ठराव खालील प्रमाणे होता 'ही विधानसभा सरकारला शिफारस करते की, या सभागृहाने केलेला विचार महामहीम सरकारला कळवावा व शक्य तितक्या लवकर मराठी भागाची रचना करून विदर्भ नावाच्या नवीन प्रांताच्या निर्मितीसाठी पावले उचलली जावी या प्रांतातील मराठी भाषिक भागांना गव्हर्नरचा प्रांत बनवावे'. बॅरिस्टर रामराव देशमुख यांच्या मतानुसार मध्य प्रांत वऱ्हाड या संदर्भात वऱ्हाड वर आजपर्यंत खूप अन्याय झाला आहे वऱ्हाड वरील अन्याय व स्थैर्य असण्याचे एकमेव कारण आपण एकंदरीत एक विसंगत आहोत. त्यांच्यामते या दोन्हीही प्रांतात समान बाबी ह्या फारच कमी आहेत. त्यांच्यामध्ये दोन्ही प्रांताच्या कल्पना, संस्कृती, भाषा व जीवनातील प्रत्येक कल्पित पैलू भिन्न आहेत आणि जोपर्यंत आपण एकक म्हणून अशा गटांमध्ये विभक्त होत नाही तोपर्यंत आदर्श किंवा कल्पनांच्या संघर्षाशिवाय या प्रांतात कधीही प्रगती होण्याची शक्यता वाटत नाही. त्यामुळे त्यांनी मराठी भाग हा मध्यप्रांतापासून वेगळा करण्यासंदर्भातला ठराव सभागृहामध्ये मांडला होता.

**४)बॅ. रामराव देशमुख यांचे गांधीजींना पत्र :-**

बॅ. रामराव देशमुख यांनी जून 1931 मध्ये काँग्रेसचे सर्वाधिकारी महात्मा गांधी यांना वऱ्हाडचा दर्जा संदर्भात पत्र लिहिले त्यामध्ये खालील प्रमाणे मजकूर होता. 'हिंदुस्थानच्या भावी फेडरेशनच्या राज्यघटनेविषयीचा प्रश्न निकालात काढत असताना आपण वऱ्हाडच्या जनतेला अत्यंत महत्त्वाचा वाटत असलेला वऱ्हाडच्या दर्जा संबंधीचे प्रश्नाकडे आस्थापूर्वक लक्ष द्यावे अशी विनंती आहे. शक्य असल्यास गोलमेज परिषदेला या प्रश्नाचे खास सल्लामसलतीसाठी श्री बापूजी अणे यांना बरोबर घेऊन जावे.'

**५)महाविदर्भ परिषद :-**

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

हिंदुस्तानमध्ये प्रांताची रचना ही भाषावार करण्यात यावी या धोरणाला राष्ट्रीय सभेने मंजुरी दिली होती. या योजनेनुसार वऱ्हाड मध्यप्रांताचे नागपूर, विदर्भ आणि महाकोशल असे तीन भाग निर्माण केले आहेत. भाषावार प्रांतरचनेचे धोरण राष्ट्रीय सभेप्रमाणेच ब्रिटिश सरकारनेही मान्य केले आहे. बिहार, सिंध व ओरिसा या तीन प्रांताची निर्मिती भाषावार प्रांतरचनेनुसार केली आहे. भाषेच्या आधारावर वऱ्हाड मध्यप्रांताचे जे तीन प्रांत निर्माण केले ते दोनच प्रांत करायला पाहिजे होते. नागपूर व वऱ्हाड हे मराठी भाषिक प्रांत असल्यामुळे नागपूर, वऱ्हाड मिळून एकच प्रांत निर्माण करायला पाहिजे होता. वऱ्हाड मध्यप्रांताचे भाषेवर आधारित 'महाविदर्भ' व 'महाकोशल' असे दोन प्रांत निर्माण करायला पाहिजे होते. दिनांक १ ऑक्टोबर 1938 रोजी मध्यप्रांत वऱ्हाडच्या खरे मंत्रिमंडळातील मंत्रि बॅ. रामराव देशमुख यांनी मध्यप्रांत वऱ्हाडमधील मराठी भाषिक प्रदेशाचा स्वतंत्र प्रांत निर्माण करून त्याला 'विदर्भ' नाव देण्यात यावे अशा मागणीचा ठराव कायदेमंडळामध्ये मांडला व तो मंजूर सुद्धा झाला होता. परंतु बॅरिस्टर रामराव देशमुख हे मंत्रीपदाकरिता अत्यंत योग्य व्यक्ती असून सुद्धा त्यांना पुन्हा मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले नाही. हा ठराव मध्यप्रांत कायदेमंडळाने जरी संमत केलेला असला तरीही नागपूर वऱ्हाडच्या एकीकरणाची जनतेची मागणी सुसंघटित जनआंदोलन उभारल्याशिवाय पूर्ण होणार नाही. या उद्देशाने 18 ऑगस्ट 1940 रोजी बॅरिस्टर रामराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे महाविदर्भ परिषदेची स्थापना करण्यात आली. हिंदुस्थानच्या विकासासाठी भाषावार प्रांतरचनेचे धोरण कायदेशीर व योग्य असून ते राबविण्याचे मंजूर झालेले आहे. परंतु जो सध्याचा मध्यप्रांत आहे त्यामध्ये वऱ्हाड, मराठी भाषा बोलणारे चार जिल्हे मिळून संयुक्त प्रांत निर्माण केल्यामुळे प्रांतामधील राज्यकारभारासाठी अडचणी निर्माण होत आहेत. तसेच यामुळे प्रांताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व औद्योगिक विकासाला बाधा पोहोचत आहे. त्यामुळे ही परिषद असा ठराव घेते की, विदर्भ व मराठी भाषा बोलणारा विभाग यांचा मिळून 'महाविदर्भ' म्हणून हिंदुस्थानातील एक स्वतंत्र प्रांत निर्माण करावा.

**६)महाविदर्भाची मागणी व संयुक्त महाराष्ट्र चळवळ एकमेकास सहाय्यक :-**

महाविदर्भाची मागणी व संयुक्त महाराष्ट्र चळवळ एकमेकास सहाय्यकच होती. महाविदर्भाची मागणी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रांतीय एकतेसाठी ती तात्कालीक व व्यावहारिक योजना होती. ही योजना बॅ. रामराव देशमुख, ग. त्र्य. माडखोलकर व डॉ. आबासाहेब खेळकर यांना मंजूर होती. बॅ. रामराव देशमुखांनी महाविदर्भाची मागणी म्हणजे महाराष्ट्र राज्य एकीकरणाचा पहिला टप्पा होय असे स्पष्टीकरण केले. दि. 3 ऑक्टोबर 1943 ला अमरावती येथे जयकर यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेचे दुसरे अधिवेशन भरले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले की, महाविदर्भ भविष्यात मराठी भाषिक राज्यांमध्येच समाविष्ट व्हावा. परंतु सर्वच महाविदर्भवाद्यांचा हा विचार होता असे नाही. बाबूजी आणि ब्रिजलाल बियाणी यांचे मत विरोधी होते. बॅ. रामराव देशमुख हे सुरुवातीपासूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा याच विचाराचे समर्थक होते तसेच महाविदर्भ चळवळ सुद्धा त्यांच्याच नेतृत्वात कार्यरत होती. त्यामुळे त्यांच्या संदर्भात अपसमज निर्माण करण्यात आला, त्यांचे धोरण हे अस्पष्ट किंवा दुतर्फीपणाचे आहे असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. परंतु त्यांच्या स्पष्टवक्तेपणा व कार्याद्वारे लोकांना समजले की वऱ्हाड हा मध्य प्रांताला जोडल्यामुळे वऱ्हाडमध्ये असंतोषाची भावना आहे कारण मध्यप्रदेशातील हिंदीभाषिक बहुसंख्यांक प्रांत हा संख्या व शासनाच्या जोरावर मराठी भाषिक प्रदेशावर अन्याय करतो. हिंदीभाषिक बहुसंख्यांक प्रांताकडून मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीमधूनच महाविदर्भाची मागणी पुढे आली आहे. मध्यप्रांतातील मराठी भाषिक प्रांताने भविष्यामध्ये मध्यप्रदेशात राहायचे नाही असा निश्चय करून महाविदर्भवादी आंदोलन पुकारले. महाविदर्भवाद्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी व्हावयास एक अडथळा होता. सन 1936 मध्ये निजामाने आणि वऱ्हाड इंग्रजांकडे बहाल करतांना त्यांच्यासोबत एक करार केला होता व त्या करारातील शर्तीनुसारच वऱ्हाड मध्यप्रदेशात सामील करण्यात आला होता. ज्या करारातील एक अट अशी होती की, निजामाच्या परवानगीशिवाय वऱ्हाडच्या प्रशासनामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्याचवेळेस ब्रिटिश सत्ता एका बाजूने निजामाचे लाड पुरवित होती व दुसऱ्या बाजूला भारतीयांना सत्ता सोपविण्याच्या विचारात होती. अशा स्थितीत वऱ्हाड पुन्हा निजामाच्या नियंत्रणाखाली जाण्याची भीती होती. त्यामुळे महाविदर्भवादी चळवळ ही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून वेगळी राहिली. तसेच महाराष्ट्र अस्तित्वात येण्यासाठी विलंब लागला तर वर्धा नदीपर्यंत असलेला सर्व मराठी भाषिक प्रांत भंडारा तसेच नागपूर जिल्हा हिंदीभाषिक महाकोशल गिळंकृत करेल अशी भीती सुद्धा वाटत होती. या भीतीपोटीच 'संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येणे संभाव्य नसेल तर महाविदर्भ तात्काळ अस्तित्वात यावा' अशी भूमिका बॅ. रामराव देशमुख व काही महाविदर्भवाद्यांची होती व ती तत्कालीन परिस्थितीनुसार योग्यच होती. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळताच निजामाचा करार संपुष्टात आला व योग्य परिस्थिती लक्षात घेऊन महाविदर्भवाद्यांकडून संयुक्त महाराष्ट्राच्या मराठी राज्यात समाविष्ट करून घेण्याची मागणी यशस्वी झाली. महाविदर्भाची चळवळ ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीला प्रतिरोधक नव्हती. त्यामध्ये फक्त मुसद्दीपणा व भविष्याचा वेध घेण्याचे कौशल्य समाविष्ट होते.

**७ )बॅ. रामराव देशमुख यांची भाषावार प्रांतरचनेविषयी भूमिका :-**

भाषावार प्रांतरचनेसंदर्भात वेगवेगळी मते होती. भाषावार प्रांतरचनेचा विरोध करणारी मंडळी या आधारावर विरोध करत होती की, त्यामुळे भारताची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येईल तर काहींनी हिंदी भाषा व हिंदुस्थानी या आदराच्या भावनेमुळे भाषावार प्रांतरचनेला विरोध केला होता. बॅ. रामराव देशमुख यांचे मत होते की, भाषिक आधारावर प्रांतरचनेमुळेच जनतेमधील राष्ट्रीय एकात्मतेची भावना

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

वाढीस लागेल व ही योजना लोकशाहीला पूरक व लोकांच्या अशा आकांक्षा, अपेक्षा यांना वाव देणारी ठरेल. त्याचप्रमाणे केंद्रसरकारची प्रशासकीय भाषा म्हणून व संपूर्ण राष्ट्रांला एकत्र आणणारी राष्ट्रभाषा तसेच व्यावहारिक आदानप्रदानाची भाषा म्हणून हिंदी भाषा अनिवार्य आहे. यापुढे इंग्रजी भाषेची जागा हिंदी घेईल व इंग्रजीचा वापर हळूहळू कमी होईल, परंतु एवढेच पुरेसे नाही. भारतामध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही रुजवायची असेल तर भाषावार प्रांतरचना तेवढीच महत्त्वाची आहे. याद्वारेच प्रादेशिक भाषा व संस्कृती विकसित होत जाईल. तसेच प्रादेशिक भाषेद्वारा आधुनिक ज्ञान-विज्ञान,तंत्रज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवून लोकांच्या बौद्धिक प्रगल्भतेमध्ये वाढ होऊन समाजप्रबोधन सुद्धा झपाट्याने होईल. जनता लोकशाही प्रक्रियेत उत्साहाने सहभागी होईल. लोकांना त्यांचे प्रश्न, समस्या, सोयीसुविधा या संदर्भात प्रशासनाशी थेट चर्चा विचारविनिमय करता येईल व खरी लोकशाही अस्तित्वात येईल. हिंदुस्तानमध्ये हिंदी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मानण्याला कोणाचेच दुमत नाही परंतु हिंदी भाषेचा दुराग्रह जेव्हा अमर्यादपणे केला जातो तेव्हा अडचणी निर्माण होतात कारण काही लोक जेव्हा हिंदी भाषेला संस्कृत भाषेचा मुलामा चढवून ती राष्ट्रभाषा म्हणून निश्चित करतात, तेव्हा ती इंग्रजी भाषेपेक्षा कठीण, परकी व निरोपयोगी वाटते. यामुळे जनसामान्यांच्या पचनी न पडणारी वेगळीच भाषा राष्ट्रभाषा म्हणून निश्चित करण्यासारखी आहे, त्यामुळे हिंदी भाषेविषयी रोष व्यक्त होण्याचीच संभावना जास्त आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावर व राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषा कितीही उपयुक्त असली तरी काही ठराविक भाग सोडला तरी ती विभिन्न भागातील प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषा म्हणून अस्तित्वात येऊ शकत नाही. प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक भाषेला कोणताच पर्याय उपलब्ध नसल्यामुळे भाषावार प्रांतरचनेला सुद्धा दुसरा पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे भाषावार प्रांतरचना अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे भाषावार प्रांतरचनेमुळे राष्ट्रीयतेच्या भावनेला तडा जाईल हे सुद्धा मत योग्य नाही. जर आपण इंग्रजी भाषेचा स्वीकार करून राष्ट्रीयतेची भावना जागृत ठेवली व वाढवली सुद्धा त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावर हिंदी व प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक भाषेचा स्वीकार करून राष्ट्रीय भावना वाढीस लावण्यास हातभार का लावू नये. आम्ही इंग्रजी या परदेशी भाषेला जर स्वीकारू शकलो तर हिंदी भाषेचा वापर का बरे करू नये? बॅ. रामराव देशमुख यांच्यामते भाषावार प्रांतरचना व राष्ट्रीय एकात्मता यामध्ये कोणताही विरोधाभास नाही. भाषावार प्रांतरचनेमुळे भारतीय जनतेमध्ये राष्ट्रवादी भावनेला चालना मिळेल कारण आजपर्यंत जे लोक ज्ञानापासून हेतूपुरस्कर दूर ठेवण्यात आले आहे अशा सर्व वंचित लोकांना आपल्या मातृभाषेतूनच अत्याधुनिक ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञान यांचे शिक्षण देण्यात येईल. त्याचप्रमाणे लोकशाही मूल्य, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, अधिकार व कर्तव्य, समाजवादी विचार व राष्ट्रभिमानाची भावना या सर्व गोष्टी भाषावार प्रांतरचनेमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये रुजवता येतील.

**८)अकोला करार व बॅ. रामराव देशमुख :-**

बॅ. रामराव देशमुख यांनी 1940 मध्ये संयुक्त महाराष्ट्राची संकल्पना सर्वप्रथम मांडली. संयुक्त महाराष्ट्राची रचना करण्यासाठी व त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी 1948 मध्ये मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेचे तेच अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणामध्ये अकोला कराराची पार्श्वभूमी सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, महाविदर्भातील जनतेला मध्यप्रांतातील मिळणाऱ्या भेदभावपूर्ण, सापत्नीक व अन्यायी वागणुकीमुळे आम्हाला शांत बसणे योग्य नव्हते. अशा परिस्थितीमध्ये मध्य प्रांतातील मराठी भाषिक प्रांतामध्ये शंका- कुशंका निर्माण झाल्या होत्या. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व शंकरराव देव यांच्याकडे होते. संयुक्त महाराष्ट्र व महाविदर्भ यांच्यामध्ये तळजोळीचा मार्ग काढण्यात आला. ऑगस्ट 1947 मध्ये महाविदर्भ आणि संयुक्त महाराष्ट्र यांच्या प्रमुखांमध्ये एकच मागणी करण्याच्या उद्देशाने करार झाला व त्यालाच 'अकोला करार' असे म्हणतात. अकोला येथे 8 ऑगस्ट 1947 रोजी हा करार घडून आला. या करारानुसार संयुक्त महाराष्ट्र एकाच प्रांतात एक पश्चिम महाराष्ट्र व दुसरा महाविदर्भ या दोन प्रांताचा समावेश असेल. अकोला करारानुसार संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही दोन उपप्रांतासह करण्यात आलेली आहे. ही मागणी कोणत्याच परिस्थितीत मान्य झाली नाही तर आणि तरच स्वतंत्र प्रांत म्हणून महाविदर्भ मागणीला दुजोरा द्यावा अन्यथा नाही याबाबतीत मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला आहे, असे बॅ. रामराव देशमुख यांचे मत होते, त्यांच्यामते संयुक्त महाराष्ट्रापासून वेगळे होण्याच्या भावनेतून महाविदर्भाची मागणी अस्तित्वात आलेली नसून महाकोशालपासून वेगळे होण्याच्या भावनेतूनच ती उत्पन्न झालेली आहे ही गोष्ट बऱ्याच लोकांच्या लक्षात येत नाही. अशाप्रकारे भाषावार प्रांतरचनेच्या धोरणानुसार महा कोशालपासून महाविदर्भ वेगळा करून एक स्वतंत्र प्रांत अस्तित्वात यावा याच मागणीचे बीज महाविदर्भाच्या चळवळीमध्ये दडलेले होते.

**९) नागपूर करार व बॅ. रामराव देशमुख. :-**

पश्चिम महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांचा असा प्रयत्न होता की सर्व मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र प्रांत असावा. त्याकरीता संयुक्त महाराष्ट्र चळवळ जोमाने कार्यरत होती. कोणत्याही अटीशिवाय मराठवाड्यातील जनतेने संयुक्त महाराष्ट्रात सहभागी होण्याचे जाहीर केले. परंतु जुन्या मध्यप्रदेश वऱ्हाड प्रांताची नागपूर ही राजधानी राहली असल्याने वऱ्हाडचे चार व नागपूरातील चार या जिल्ह्यांचे असे मत होते की, महाविदर्भ अस्तित्वात आला पाहिजे. परंतु वऱ्हाडमधील चारही जिल्ह्यातील बहुसंख्य नेते हे संयुक्त महाराष्ट्रात सहभागी होण्यासाठी जनतेला प्रेरित करीत होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 1953 मध्ये राज्यघटकांच्या पुनर्रचनेकरिता कमिशन नेमले जाण्याचे घोषित केले.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे समर्थक जागे झाले तसेच संयुक्त महाराष्ट्राचे विरोधक सुद्धा क्रियाशील झाले. संपूर्ण महाराष्ट्रातील विभिन्न विभागातील जनता व नेते यांचे भिन्न प्रकारची मते होती.

महागुजरातवाल्यांचा मुंबई संयुक्त महाराष्ट्रमध्ये सामील करायला विरोध होता. ब्रिजलाल बियाणींचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध असला तरी महाविदर्भाची त्यांची मागणी होती तर स. का. पाटील यांची स्वतंत्र मुंबई शहर राज्याची मागणी होती. अशाप्रकारे मराठी भाषिकांमध्ये मतभेद निर्माण झाले होते, याचाच फायदा घेऊन काँग्रेसश्रेष्ठी संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकारत होते. पंडित नेहरूंच्या मते, तुम्हाला भाषिक प्रांत हवे असतील तर सुरुवातीला तुमच्यामध्ये एकमत घडवून आणा यासंदर्भात मला कसे विश्वासात घ्यायचे हा प्रश्न नसून तुम्ही एकमेकांना कसे विश्वासात घेता हा महत्त्वाचा प्रश्न आहे. यासंदर्भात भाऊसाहेब हिरे यांचे असे मत होते की, महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या तिन्ही विभागातील प्रभावी नेत्यांनी एक होऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणे आवश्यक आहे. सयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील होणाऱ्या सर्व विभागांना समान दर्जा प्राप्त होईल तसेच मागासलेपणाचा विचार करून त्यांच्याकरीता विभिन्न प्रकारचे विकासात्मक उपक्रम राबवले जातील. अशाप्रकारचा आश्वासक करार होणे आवश्यक होते. हिरे यांनी तीनही विभागातील नेत्यांशी सल्लामसलत सुरू केली. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या मागणी संदर्भातील विरोध विचारात घेऊन त्यांनी विभिन्न मार्गाने भेटीगाठी, विचारविनिमय व पत्रव्यवहार, चर्चा यामाध्यमातून पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. िनांक 28 सप्टेंबर 1953 रोजी महाराष्ट्र,मराठवाडा व विदर्भ या तिन्ही विभागातील पुढाऱ्यांनी सर्व मराठी भाषिक प्रांताचे सलग एकच राज्य अस्तित्वात यावे व मुंबई ही त्याची राजधानी असावी, असा अकरा कलमी करार केला. या करारामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठबळ मिळाले व अकोला कराराची जागा नागपूर कराराने घेतली. या करारावर पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे नेते आणि महाविदर्भातील संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन करणारे नेते यांच्या सह्या होत्या.

**१०) संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व बॅ. रामराव देशमुखांची भूमिका -:**

महाराष्ट्राच्या संदर्भात केंद्रीय नेतृत्वाने विभिन्न प्रकारच्या योजनांचा वापर केलेला दिसून येतो. द्विभाषिक राज्य, त्रिराज्य योजना, मुंबई केंद्रशासित प्रदेश परंतु या सर्व योजनांना महाराष्ट्रातील जनतेने प्रखर विरोध केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा आता फार काळ केंद्रीय नेतृत्वाला तात्काळत ठेवता येणार नव्हता. आचार्य अत्रे सारख्या लेखकांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला भरीव हातभार लावला. तत्कालीन मुख्यमंत्री गोविंद वल्लभपंत हे महाराष्ट्रामध्ये आले असता मुंबई ही महाराष्ट्रातच असायला पाहिजे ही लोकभावना त्यांना कळली. मुंबईचे राज्यपाल श्रीप्रकाश यांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा राज्यपाल परिषदेत मांडला. नेहरूंच्या विचारांमध्ये सुद्धा बदल झाला, काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधी यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यासोबत नागपूर अधिवेशनामध्ये या संदर्भात चर्चा विचारविनिमय केला होता. नेहरूंना असे वाटत होते की संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य केली तर पंजाबी सुब्याची मागणी पुढे येईल. केरळमधील काँग्रेस पक्षाने चळवळ उभारून तेथील कम्युनिस्ट सरकार बडतर्फ करायला लावले. वरील सर्व बाबींमुळे महाराष्ट्रातही डावी आघाडी अस्तित्वात येऊ नये म्हणून संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करणे त्यांना आवश्यक होते. चंदीगड येथील काँग्रेस अधिवेशनामध्ये महाराष्ट्र व गुजरात यांच्यामध्ये तोडगा काढण्याकरिता नियुक्त केलेल्या नऊ सदस्य असलेल्या समितीने आपला अहवाल 19 डिसेंबर 1959 रोजी प्रसिद्ध केला. या अहवालाच्या आधारावर गुजरातमध्ये आर्थिक हितसंबंध सांभाळण्यात येऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करावा असे मत गुजरात व महाराष्ट्रातील जनतेने मान्य केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये एस. एम. जोशी यांचे अभूतपूर्व असे योगदान होते व त्यांच्या मदतीला प्र. के. अत्रे, केशवराव जेधे सुद्धा होते. सर्व विरोधी पक्षातील नेत्यांनी चळवळीचे नेतृत्व केले होते. एस. एम. जोशी हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस होते. त्यांच्या उत्स्फूर्त व धडाडीच्या नेतृत्वामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला उभारी प्राप्त झाली. संयुक्त महाराष्ट्र परिषद ही अनेक घटक पक्षांमिळून अस्तित्वात आली होती. एस एम जोशी यांनी निरंतरपणे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी प्रयत्न केले होते. सन 1920 पासून भाषावार प्रांतरचनेच्या तत्वाच्या परिपूर्तीसाठी हा चळवळीचा संघर्ष चालू होता. श्रीपाद अमृत डांगे यांची भूमिका ही मुंबईचे स्वतंत्र राज्य असावी अशी होती परंतु एस.एम. जोशी यांनी त्यांच्या या भूमिकेला सुरुंग लावला. द्वैभाषिक मुंबई राज्याचे १ मे 1960 रोजी विभाजन होऊन महाराष्ट्र व गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्य अस्तित्वात आली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे बहुतांश जनतेचे स्वप्न साकार झाले.

**निष्कर्ष. :-**

अशाप्रकारे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या इतिहासावर आपण नजर टाकली तर असे दिसून येते की, 11 ऑक्टोंबर 1938 रोजी बॅ. रामराव देशमुख यांनी मध्यप्रदेशात असलेल्या वऱ्हाडचा स्वतंत्र प्रांत बनविण्याचा प्रस्ताव विधिमंडळासमोर मांडला होता. तेथून पुढे 28 जानेवारी 1940 मध्ये संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना झाली व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला चालना मिळाली. त्यांनी संपूर्ण आयुष्यभर संयुक्त महाराष्ट्राचा वारसा जोपासला. विभिन्न सभा, संमेलने, संस्थांच्या माध्यमातून आपले विचार प्रकट केले. सन 1940 ते 1948 असे दोनदा बॅ. रामराव देशमुख हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष होते व त्यामाध्यमातून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राविषयी आपली भूमिका मांडली. त्यांच्या मते भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्मा गांधीजींच्या भारताच्या सुधारणे संदर्भात ज्या योजना होत्या त्यामधील प्राथमिक योजना म्हणजे भाषावार प्रांतरचना व इतर कोणत्याही पर्यायापेक्षा हा सर्वश्रेष्ठ पर्याय होता व परिस्थितीनूरूप हे तत्व भारताला स्वीकारावे

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 September-October 2025 / VOL -02 ISSUE-II

लागेल. म्हणूनच प्रांतांची पुनर्रचना हे भाषेच्या आधारावर करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वऱ्हाडमधील लोकांना कोणत्याही परिस्थितीत मध्यप्रांतांमध्ये राहण्याची इच्छा नाही. मदध्यप्रांताचे अन्यायी धोरण त्यांना नकोसे झालेले आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती त्यांना आवश्यक वाटत होती. कारण मुंबईची निर्मिती ही कामगारांनी केली होती. त्यांचा अधिकार मुंबई शहरावर असायला पाहिजे परंतु काही भांडवलदार व मोठे व्यापारी यांचे मुंबईमध्ये हितसंबंध जुळलेले असल्यामुळे त्यांना महाराष्ट्रात राहणे मान्य नव्हते. या भांडवलदारांना वाटत असे की, मुंबई शहर हे महाराष्ट्रात समाविष्ट केल्यामुळे आपल्या आर्थिक हितसंबंधांना बाधा पोहोचेल. महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करणे म्हणजे त्याचा आत्माच बाहेर काढणे होय. भांडवलदार वर्गाला मक्तेदारी टिकवण्याच्या उद्देशाने व नफा कमावण्याच्या स्वार्थीवृत्तीने मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करायचे आहे. भांडवलदारांच्यामते मुंबईची निर्मिती त्यांनीच केली आहे व त्यामुळे त्यांचा मालकी हक्क मुंबईवर आहे. परंतु मुंबई ही सर्वांच्या सहकाऱ्यांने निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे बॅ. रामराव देशमुखांच्यामते विदर्भाचा समतोल विकास हा संयुक्त महाराष्ट्रामध्ये राहूनच होऊ शकतो. मुंबई राजधानी असलेल्या संयुक्त महाराष्ट्रापासून जर विदर्भ वेगळा करण्यात आला तर विदर्भ हा दुर्बल होऊन जाईल. बॅ. रामराव देशमुखांचा अशा प्रकारचा प्रामाणिक सल्ला वऱ्हाडवासियांकरीता होता व त्याकरिता त्यांनी आयुष्यभर अथक प्रयत्न केले.

**संदर्भ :-**

1. कोरपे कुसुमताई वामनराव, विदर्भातील नेतृत्वाची वाटचाल 1902 ते 1975.
2. मोहिनी हरिकृष्ण 'महाविदर्भाची रूपरेषा' प्रकाशन महाविदर्भ प्रकाशन व प्रचारक मंडळ मुद्रांक दातार नरकेसरी प्रेस नागपूर.
3. तराळ सतीश 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि भाऊसाहेब लोक महर्षी भाऊसाहेब डॉक्टर पंजाबराव देशमुख' गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई डिसेंबर 1999.
4. ब्राह्मणकर आनंद 'बॅरिस्टर रामराव देशमुख महाविदर्भ आणि संयुक्त महाराष्ट्र' पद्मभूषण बॅरिस्टर रामराव अण्णासाहेब देशमुख जन्मशताब्दी स्मरणिका.
5. सोनखास्कर ज्योत्सना ' कर्मवीर भाऊसाहेब हिरे' ग्रंथाली प्रकाशन मुंबई.
6. फडके य. दी विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड सहावा 1948 ते 1960 मौज प्रकाशन मुंबई.
7. संयुक्त महाराष्ट्र परिषद मुंबई कैलासवासी पद्मभूषण रामराव देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण पद्मभूषण बॅरिस्टर रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख जन्मशताब्दी स्मरणिका.
8. जोशी श्रीपाद भालचंद्र 'वेगळा विदर्भ किंवा अखंड महाराष्ट्र एका वादाची सद्यस्थिती' ग्रंथाली प्रकाशन मुंबई